हिमोफिलिया आजाराच्या नियंत्रणासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी समिती स्थापन करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन पूरकपत्र क्रमांकः बैठक-१५२६/प्र.क्र.४३/असंसर्ग-२

गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,
१० वा मजला, मंत्रालय, मुंबई ४०० ००१
दिनांक: ०३ जुलै,२०२६

वाचा -

१. मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांच्या अध्यक्षतेखाली दि. १३.०५.२०२६ रोजी हिमोफिलीया या आजारावरील उपचारासंदर्भात झालेल्या बैठकीचे दि. १८.०६.२०२६ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या बैठकीचे इतिवृत्त.
२. उपसंचालक (हिमोग्लोबिनोपॅथी), आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र क्र. जा.क्र.राआसो./राज्य रक्त कक्ष/२८१३९-२५२४१, दि.०९.०६.२०२६
३. सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र. बैठक-१५२६/प्र.क्र.४३/असंसर्ग-२ दि. १८.०६.२०२६.

शासन पूरकपत्र

हिमोफिलिया आजाराच्या नियंत्रणाच्या अनुषंगाने उपाययोजना सुचविण्यासाठी सचिव (२) सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली वाचा क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये एक राज्यस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीमध्ये खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे सदस्य म्हणून उपसचिव (असंसर्गजन्य आजार -२) यांचा समावेश करण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	समितीमधील पद
१	उपसचिव (असंसर्गजन्य आजार-२), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.	पदसिद्ध सदस्य

सदर शासन पूरकपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२६०७०३१७३४३०२४१७ असा आहे. हे शासन पूरकपत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Digitally signed by NILESH N THAKUR
Date: 2026.07.03 17:49:55 +05'30'

(निलेश ठाकूर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१)मा. मंत्री (सा.आ.) यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई.

२)मा. राज्यमंत्री (सा.आ.) यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई.

३)मा. प्रधान सचिव यांचे स्वीय सहायक, सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय, मुंबई.

४)मा. सचिव (२) यांचे स्वीय सहायक, सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय, मुंबई.

५)आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.

६)संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई/पुणे.

७)सहसचिव/ उपसचिव सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय, मुंबई.

८)सहसंचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई/पुणे.

९)सहाय्यक संचालक, राज्य रक्त संक्रमण परिषद, मुंबई.

१०)सहाय्यक संचालक ,(राज्य रक्त कक्ष(, राष्ट्रीय आरोग्य अभियान.मुंबई ,

११) समितीतील सर्व सदस्य (आयुक्तालयामार्फत प्रत)

१२) निवडनस्ती (असंसर्गजन्य आजार-२)